# प्र क र ण - प हि ले

## अभ्यासाचा ( संशोधनाचा )

## आराखडा आणि पध्दती

अ) प्रास्ताविक

ब) कोल्हापूर शहरातील ऑटोरिक्षा व्यवसायाचा इतिहास

क) अभ्यासाची उद्दिष्ट्ये, उद्देश, हेतु

ड) अभ्यासाचा आराखडा

इ) प्रकरणांचे सादरीकरण

प्रास्ताविक :

कोल्हापूर शहराचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्व आहे. कित्येक वर्षांच्या परंपरेतून हे व्यक्तिमत्व आकारास आले आहे. या शहराच्या सद्भाग्याने राजर्षि शाहू महाराजांसारखे नेतृत्व या शहरास लाभले. जीवनातील सर्वच क्षेत्राकडे पाहण्याची महाराजांची जिज्ञासू दृष्टी व त्यामधून या शहराच्या विकासास आकार देणारी अनेक क्षेत्रे येथे निर्माण झाली. समाज - परिवर्तनाचे व्यासपीठे येथे निर्माण झाली. समाजपरिवर्तनाचे व्यासपीठ बनलेल्या या शहराने प्रगतीची घोडदौड जबरदस्त वेगाने सुरु केली आणि महाराष्ट्रातील सधन जिल्हा म्हणून हा भाग नावारुपाला आला.

सहकार क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र यामध्ये या शहराचा वरचा क्रमांक लागतो. कोल्हापूरच्या कोल्हापुरी चपलांना जागतिक बाजारपेठ मिळाली आहे. तर कोल्हापुरी गुळानेही ग्राहकांवरील आपली पकड अद्यापतरी सोडली नाही. कुस्तीक्षेत्रात कोल्हापूर नेहमीच अग्रभागी राहिले आहे. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदीर तीर्थक्षेत्र बनले असून दक्षिणेतील काशी म्हणून कोल्हापूर ओळखले जाते. जोतिबा, पन्हाळा या पर्यटन स्थळांची सोबत कोल्हापूरला लाभली आहे. या शहराच्या व्यक्तिमत्वाचा आणखीन एक पैलू म्हणजे धारोष्ण दूध. गंगावेशला रात्री दोन वाजता जा. धारोष्ण दूध हमखास मिळणारच.

राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदर्शी धोरणांमुळे कोल्हापूरने औद्योगिक क्षेत्रात आघाडी मारली आहे. उद्यमनगर, घाटगे-पाटील उद्योग समूह, व अलिकडील एम.आय.डी.सी.चे प्रकल्प यामुळे कोल्हापूरचा औद्योगिक क्षेत्रात दबदबा वाढत आहे. १९५८ ते १९७० या काळात येथील औद्योगिकरणाला बहर आला. पूरक उद्योगांनाही बहर आला. १९८७ अखेर कोल्हापुरात १ हजार ३०९ इंजिनिअरींग लघुउद्योगांची नोंद झालेली होती. त्यापैकी २३ ( १.७६ टक्के ) १९६० पूर्वी, ३४८ (२६.४९ टक्के ) १९६१ ते १९७० या काळात ५६८ (४३.४९ टक्के ) १९७१ ते १९८० या काळात व ३७० ( २८.२६ टक्के ) १९८१ ते १९८७ या काळात स्थापन झालेले होते. यापैकी ६४ टक्के कारखाने वैयक्तिक मालकीचे, ११ टक्के कौटुंबिक भागीदारीत नि २२.५ भागीदारी पध्दतीने संघटित झालेले होते.

भोगावती, दूधगंगा, वेदगंगा आणि पंचगंगा या नद्यांमधून बाराही महिने मिळणारे पाणी व त्यांच्या सोबतीला राधानगरी तलाव यामुळे कोल्हापूरची शेती सर्वांना आकर्षित करून घेते. सुखी, समाधानी जीवन जगायला मदत करते आहे. कोल्हापूर शहराच्या भोवती सहज डोकावले तरी सहा ते सात साखर कारखाने डौलाने उभे असलेले आढळून येतील. कोल्हापूरचा " शेतकरी संघ " तर संपूर्ण अशिया खंडाचा कुतुहलाचा व कौतुकाचा विषय ठरला आहे , आणि आता गोकुळ दूध प्रकल्पाने यशाची शिखरे पादाक्रांत करायला मोठ्या जोमाने प्रारंभ केला आहे. सर्वच क्षेत्रात प्रगतिपथावर असलेले हे शहर शिक्षणात मागे राहणेच शक्य

नाही. समाजातील अगदी शेवटच्या माणसाला ज्ञान मिळावे यासाठी याच शहरात शिवाजी विद्यापीठ गेली २५ वर्षे अव्याहतपणे ज्ञानी, गुणी माणसांच्या जडणघडणीत आपला सिंहाचा वाटा उचलत आहे. २१ व्या शतकाला सामोरा जाणारा नवमानव निर्माण करण्यासाठी डॉ.डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीने वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करुन कोल्हापूरच्या गेल्या कित्येक वर्षांच्या स्वप्नांची पूर्ती केली आहे. दै.पुढारी, दै.सकाळ, दै.केसरी, दै.सत्यवादी, दै.समाज, दै.लोकसेवक व दै.जनसारथी आणि इतर साप्ताहिके, पाक्षिके नि मासिकांनी कोल्हापूरच्या वृत्तपत्र सृष्टीला सदृढ बनविले आहे.

अशा या बहुरंगी, बहुढंगी कोल्हापूर शहराच्या जवळ जवळ सर्वच पैलूंवर अभ्यासकांनी अभ्यास केला आहे, संशोधकांनी संशोधन केले आहे, काहीजण अद्यापही करीत आहेत. काही पैलूंवर विशेषांक निघाले आहेत मात्र या कोल्हापूर शहराचा एक पैलू अद्यापही उपेक्षित राहिला आहे, म्हणावे तितके लक्ष या पैलूकडे अद्यापही कोणी दिलेले नाही. हा पैलू म्हणजे कोल्हापूरी रिक्षा होय. कोल्हापूरच्या एकंदर व्यक्तिमत्वास साजेशी खास कोल्हापुरी रिक्षा येथे पहावयास मिळेल. मुंबई, पुणे, बेळगाव या व इतर मोठ्या शहरात रिक्षा आहेत. दिल्ली, कलकत्ता या शहरातही रिक्षा आहेत पण कोल्हापूरच्या रिक्षांची काही खास वैशिष्टये आहेत.

अर्थात मी या ठिकाणी कोल्हापूरातील रिक्षा चालकांच्या

(रिक्षा ड्रायव्हरांच्या) आर्थिक व सामाजिक अभ्यासाचाच प्रामुख्याने विचार मांडलेला आहे, अभ्यास केलेला आहे.

कोल्हापूर शहरातील ॲटोरिक्षा

व्यवसायाचा इतिहास :

कला, क्रीडा, शिक्षण, व्यापार आणि विविध व्यवसाय यांचा सुरेख संगम असणारी अशी ही करवीर नगरी म्हणून कोल्हापूरचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारानुसार वाटचाल करणाऱ्या या करवीर नगरीने सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. शिवाय या नगरीत नैसर्गिक अनुकुलताही लाभलेली आहे. परिणामी वाहतूक क्षेत्रच वर्षानुवर्षे अधिकच प्रगत होत चालले आहे. १९६२ साली कोल्हापूरात पहिल्या ॲटोरिक्षाचे पदार्पण झाले. १२ ऑक्टोबर १९६२ रोजी कोल्हापूरात पहिली रिक्षा आली, आणि त्यावेळचे महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री श्री.यशवंतराव मोहिते यांनी त्र्यंबोली यात्रेच्या निमित्ताने पहिल्या वाहतूक व्यावसायिक ॲटोरिक्षाचे समारंभपूर्वक उद्घाटन केले. म्हणजेच खऱ्या अर्थाने १९६२ पासूनच करवीर नगरीत जनतेच्या सेवेसाठी ॲटोरिक्षा कार्यरत झाली, ॲटोरिक्षा व्यवसायाचा प्रारंभ झाला. १९६२ पासून आजपर्यंत या रिक्षा व्यवसायाने कोल्हापूर शहरात एक वेगळेच स्थान प्राप्त केले आहे. १९६२ मध्ये करवीर नगरीत ॲटोरिक्षा व्यवसायाची सुरुवात झाली त्यावेळी कोल्हापूरात फक्त ४ (चार) ॲटोरिक्षा होत्या. त्यानंतर मात्र या शहरात रिक्षा व्यवसाय अधिक विकसित होत गेला. जानेवारी १९८२ मध्ये कोल्हापूर

शहरातील रिक्षांची संख्या २५०० ( दोन हजार पाचशे ) इतकी झाली तर ३१ मार्च १९८८ च्या आकडेवारीनुसार या रिक्षांची संख्या ५००० इतकी झालेली आहे. हा ऑटोरिक्षांचा व्यवसाय रिक्षाचे मालक आणि रिक्षा ड्रायव्हर यांच्याकडून केला जातो आहे. या रिक्षा व्यवसायाच्या प्रगतीबरोबरच ह्या व्यवसायात काही संघटनांचीही स्थापना झालेली आहे. त्यामध्ये करवीर ऑटो-रिक्षा युनियन, कॉंग्रेस (आय) ऑटोरिक्षा युनियन, आदर्श रिक्षा संघटना, शिवशक्ती ऑटोरिक्षा युनियन इत्यादी आणि इतर काही संघटनांचा प्रामुख्याने समावेश आहे.

अगदी सुरुवातीला हा रिक्षा व्यवसाय पूरक किंवा साहाय्यक व्यवसाय म्हणून केला जात होता. नंतर नंतर मात्र उपजिवीकेचे एक साधन म्हणून या व्यवसायाकडे काही लोक वळलेले दिसून येतात. अगदी गेल्या ५ ते १० वर्षांचा या व्यवसायाचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की एखाद्या तरुणाला किंवा युवकाला एखादी पदवी प्राप्त करुनही कुठेच नोकरी मिळत नाही तेव्हा तो तरुण (युवक) हा या रिक्षा व्यवसायाकडे वळला आहे. या रिक्षा व्यवसायाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्व व्यवहार हा रोखीने होतो. रिक्षामधून प्रवास करणारा प्रवासी हा आपला प्रवास संपताच ताबडतोब झालेले बील (भाडे ) रोख पैशात रुपयात देतो. येथे उधारीला अजिबात स्थान नाही. इतर काही व्यवसायात जसे " कृपया उधार मागू नका " "आज रोख उद्या उधार" किंवा ठराविक खरेदीनंतर काही आकर्षक भेट किंवा कमिशन असते त्यापैकी कोणताच प्रकार या व्यवसायात आढळत नाही.

अगदी "रोख व्यवहार" हे या व्यवसायाचे खास वैशिष्ट्य आहे. याचबरोबर अगदी दिवसातील २४ तास चालणारा, वेळेचे कोणतच बंधन नसणारा असा हा व्यवसाय आहे. याशिवाय या व्यवसायासाठी अगदीच मोक्याची किंवा पूर्णत: मालकीची जागा असलीच पाहिजे असे नाही. आपण ज्या घरात राहतो त्या घरासमोर अगदी मुख्य रस्त्याच्या बाजूला जरी रिक्षा उभा केली तरी चालते किंवा घराशेजारच्या जागेत रिक्षा थांबवून आपण आपल्या घरी विश्रांती घेऊ शकतो. त्याचप्रमाणे या व्यवसायाची प्रत्येक दिवसाची सुरुवात ही अगदी आमक्या वेळेतच झाली पाहिजे असेही कोणते बंधन असत नाही. अगदी आपल्या वेळेनुसार आपण रिक्षा बाहेर काढू शकतो किंवा बंदही करु शकतो. तसेच एखाद्याच्या अडीअडचणीसाठी वेळेचं बंधन न पाळता रिक्षा केव्हाही बाहेर काढू शकतो.

अगदी सुरुवातीच्या काळात मेसर्स घाटगे-पाटील हेच रिक्षाचे प्रमुख एजंट व वितरक होते, आणि रिक्षा अगदी सहजासहजी उपलब्ध होत नव्हती. एखादी रिक्षा खरेदी करावयाची असेल तर त्यासाठी खूप प्रतिक्षा ( Waiting ) करावे लागत असे; ही प्रतिक्षा यादी खूपच मोठी असे कारण त्या काळात रिक्षांना मागणीही खूपच होती. अगदी महिन्याला एक किंवा दोन रिक्षा नव्याने मिळत असत नि रिक्षाला असणारी मागणी मात्र त्यामानाने खूपच होती, कारण त्या काळात तो व्यवसायही तसा आकर्षक व्यवसाय होता. परिणामी त्याकाळी परिस्थितीनुसार काळाबाजार सुरु झाला. त्याकाळी अगदी नव्या रिक्षाची ( New Rickshaw ) किंमत ७००० रुपये (सात हजार रुपये ) होती पण काळ्याबाजारात

१२,००० रुपयांस (बारा हजार रुपयांस) रिक्षा विकली जायची. १९६४ अखेर कोल्हापुर शहरातील रिक्षांची संख्या ७० इतकी (सत्तर इतकी) होती. याच काळात रिक्षांच्या टायरट्यूबची किंमत ३४ रुपये ते ३५ रुपये होती. आणि पेट्रोलचे दर ८७ पैसे प्रति लिटर असे होते. शिवाय याच प्रमाणात अगदी अल्प किंमतीत रिक्षांचे स्पेअर पार्टस मिळत असत. या व्यवसायात त्या काळात खूपच नफा मिळत होता त्यामुळे अधिकाधिक लोक या व्यवसायाकडे आकर्षित झालेले होते ; परिणामी रिक्षा खरेदी-विक्रीतील काळ्याबाजारास अधिकच चालना मिळत गेली. अर्थात नंतर हा काळाबाजार थांबविण्यासाठी शासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात आली. किमान रिक्षा खरेदीच्या वर्षात तरी रिक्षा मालक ती रिक्षा विकणार नाही यासाठी नियंत्रणात्मक असा कायदा सरकारने केला नि काही प्रमाणात का असेना काळा बाजार कमी झाला, थांबला. नंतर शासनाने किमान दोन वर्षे तरी रिक्षा हस्तांतरीत करण्यास ( Transfer ) पायबंद घातला. त्यामुळेही काळाबाजार खूपच कमी झाला.

सुरुवातीच्या काळात रिक्षा भाडे हे मिटरप्रमाणे दिले जात नव्हते कारण रिक्षांना मिटरच नव्हते. नंतर मात्र रिक्षा भाडे हे मिटरनुसारच देण्यात येऊ लागले ते आजतागायत मिटरनुसारच रिक्षा भाडे दिले जाते.

इटालियन कंपनी लॅम्ब्रेटा ( Lambretta ) आणि भारत या सहसंबंधातूनच भारतात १९६७ पर्यंत ऑटोरिक्षांची निर्मिती केली जात होती. मात्र १९६७ नंतर मेसर्स बजाज ( पुणा ) या कंपनीकडून रिक्षा निर्मिती करण्यात येऊ लागली. या रिक्षा त्याकाळी कोल्हापूरात मोठ्या प्रमाणात उपलब्ध

झाल्या. १९७३ मध्ये रिक्षांची संख्या कोल्हापूरात ७५४ झाली. तसेच पेट्रोलचा दरही प्रतिलिटरला वाढला. १९६९ मध्ये कोल्हापूरातील जनतेला ॲटोरिक्षा मालक चालकांचा एक मोठा संप पाहण्याचा योग आणि तोही प्रचंड प्रमाणात व पहिल्यांदाच आला. १९७४ पासून तर रिक्षांच्या किंमतीत खूपच वाढ झाल्याचे दिसून येते.

१९७० पासून १९८९ पर्यंत विविध वस्तूंच्या (बाबींच्या, घटकांच्या) किंमती किती प्रचंड प्रमाणात वाढल्या हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| घटकाचे नाव | १९७० ची किंमत (खर्च) रुपयात | १९८० ची किंमत (खर्च) रुपयात | १९८९ ची किंमत (खर्च) रुपयात |
|---|---|---|---|
| १) ॲटोरिक्षाची किंमत | ८,२३० रु. | १७,००० रु. | ३३,००० रु. |
| २) पेट्रोल (प्रति लिटर) | १ रु.५५ पै. | ७ रु. | १० रु. |
| ३) टायर आणि ट्यूब | ६५ रु. | ३२५ रु. | ५४० रु. |
| ४) कलरिंग (रंगकाम) | ८० ते १०० रु. | ३५० ते ४०० रु. | ५०० रु. |
| ५) कोचिंग ॲन्ड दी टॉप | ३०० रु. | १३०० रु.<br>७५० रु.<br>(साधी) | १,८०० रु.<br>९५०<br>(साधी) |
| ६) पासिंग फी | १५ रु. | ३० रु. | ५० रु. |
| ७) रजिस्ट्रेशन फी | १५ रु. | ३० रु. | ५० रु. |

सध्या कोल्हापूरात ५,००० रिक्षा असून ८,००० लोक या रिक्षांवर व्यवसाय करीत आहेत.

१) रिक्षांची एकूण संख्या - ५,०००

२) रिक्षांचे मालक-कम-ड्रायव्हर - ५,०००

३) फक्त ड्रायव्हर - ३,०००

संपूर्ण महाराष्ट्रात १ लाख ८ हजार १९ एवढी रिक्षांची संख्या असून एकट्या कोल्हापूर शहरात ५ हजार रिक्षा आहेत.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये, उद्देश आणि हेतू :

(Aims and Objectives of the study)

कोल्हापूर शहरातील रिक्षा चालकांच्या (ड्रायव्हरांच्या) अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये, उद्देश आणि हेतू पुढीलप्रमाणे :

१) रिक्षा ड्रायव्हरांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे, परिस्थिती जाणून घेणे.

२) रिक्षा ड्रायव्हरांच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबतीत माहिती करून घेणे.

३) रिक्षा ड्रायव्हरांची कामाची परिस्थिती समजावून घेणे, कामाच्या परिस्थितीतील प्रश्नांची, समस्यांची ओळख करून घेणे, जाणून घेणे.

४) रिक्षा ड्रायव्हरांना भेडसावत असणाऱ्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांची माहिती घेणे.

या अभ्यासावरुन समाजाला व शासनाला रिक्षा ड्रायव्हरांच्या काही समस्या संघटितरित्या दर्शविल्या जाणार आहेत. त्यातून काही समस्या सोडविण्यासाठी अल्पसे का असेना पण मार्गदर्शन होणार आहे.

**संशोधनाचा ( अभ्यासाचा ) आराखडा आणि पध्दती :**

(Research Design and Methodology)

कोल्हापूरातील रिक्षा ड्रायव्हरांच्या सामाजिक आणि आर्थिक अभ्यासासाठी (१) प्रकरणांची निवड व मांडणी केली, (२) अभ्यासाचा एकूण आवाका विचारात घेतला, (३) अभ्यासाची उद्दिष्टये, हेतू विचारात घेतले, (४) प्रश्नावली तयार केली, (५) नमुना पध्दतीनुसार ड्रायव्हरांची निवड केली, (६) तथ्यांचे संकलन केले, (७) अहवाल लेखन केले.

**नमुना पध्दतीचा अवलंब :**

कोल्हापूर शहरातील रिक्षा ड्रायव्हरांच्या सामाजिक-आर्थिक अभ्यासासाठी नमुना पाहणीच्या पध्दतीचा अवलंब केलेला आहे. कोल्हापूर शहरातील रिक्षांची संख्या आज ५००० (पाच हजार) झाली असून रिक्षा चालकांची (ड्रायव्हरांची) संख्या ८,००० (आठ हजार) झालेली आहे. एवढ्या सर्व रिक्षा ड्रायव्हरांचा प्रश्नावलीच्या आधारे अभ्यास करणे वेळेच्या व इतर दृष्टीने कठीण काम होते म्हणून मी ३०० (तिनशे) रिक्षा ड्रायव्हर अभ्यासासाठी निवडले. ही निवड करताना प्रत्यक्ष जागेवर जाऊन समोर दिसेल तो रिक्षा ड्रायव्हर अभ्यासासाठी निवडला आहे. एखाधा रिक्षा स्टॉपवर किंवा रस्त्यावर एखाधा रिक्षाची निवड करुन रिक्षा ड्रायव्हरकडून

प्रश्नावली भरून घेतली आहे. कोल्हापूर शहरातील बिंदू चौक, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, राजारामपुरी, शिवाजी पेठ, गंगावेश, मंगळवार पेठ, बुधवार पेठ, आझाद चौक, आणि उपनगरांपैकी साने गुरुजी वसाहत, वाशी नाका, संभाजीनगर, वर्षानगर, जवाहरनगर, नेहरू नगर, प्रतिभानगर, टाकाळा, टेंबलाई, कसबा बावडा, फुलेवाडी, रत्नाप्पा कुंभार नगर, जागृती नगर, शिवाजी विद्यापीठ परिसर, शिवाजी पेठ, सोमवार पेठ, कोळेकर तिकटी, आदी ठिकाणी व परिसरातही (उपहारनगरातही) प्रत्यक्षात जाऊन (भेट देऊन) तेथे त्या त्या वेळी जे भेटतील अशा रिक्षा ड्रायव्हरांच्याकडून चक्रीमुद्रित केलेली प्रश्नावली भरून घेण्यात आलेली आहे. त्या प्रश्नावलीच्या उत्तरातून तथ्यांचे संकलन ( Data Collection ) केले आणि त्याचा उपयोग अहवाल लिहिण्यासाठी केला. याशिवाय विविध रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर झालेली चर्चा, विविध स्थानिक व इतरत्रच्या दैनिकातून रिक्षा व्यवसायासंबंधी प्रसिध्द झालेली माहिती ( वृत्तपत्रातील कात्रण ), रिक्षा संघटनांनी वेळोवेळी सादर केलेली ( प्रसिध्द केलेली ) पत्रक, पुस्तीका आदींचा उपयोग सदर अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

प्रकरणांची योजना ( नियोजन ) आणि अहवाल लेखन :

-वरील सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मी प्रकरणांचे योजन (नियोजन) केले. मी या अभ्यासासाठी प्रकरणांचे जे योजन ( नियोजन) केले, प्रकरणांची जी योजना तयार केली ती पुढीलप्रमाणे :

प्रकरण १ ले : अभ्यासाच्या पध्दतीबद्दलची प्रस्तावना, अभ्यासाचा आराखडा.

प्रकरण २ रे : रिक्षा ड्रायव्हरांचे ( चालकांचे ) सामाजिक जीवनमान.

प्रकरण ३ रे : रिक्षा ड्रायव्हरांचे आर्थिक जीवनमान.

प्रकरण ४ थे : रिक्षा ड्रायव्हरांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या ( प्रश्न ).

प्रकरण ५ वे : निष्कर्ष आणि उपाययोजना, सूचना, सल्ला.

••